१

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
सोमवार दि.२२१२.२००३ रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ९६ वी बैठक सोमवार दि.२२/१२/२००३ रोजी दुपारी ४.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

१.	.मा.आमदार श्री. सचिन भाऊ अहिर	सभापती
२.	श्री. सुरेश कारंडे	मुख्य अधिकारी
३.	मा. श्री. सचिन मा. सावंत	सदस्य
४.	मा.श्री.बाप्पा सावंत	सदस्य
५.	मा. श्री.रघुनाथथवई	सदस्य
६.	मा.श्रीमती छाया कल्याणी	सदस्या
७.	मा. श्री.रमेश परब	सदस्य
८.	मा. श्री. मोहन देसाई	सदस्य
९.	मा. श्री. संजय शिर्के	सदस्य
१०.	मा श्री. अबुबकर मुसा बाटलीवाला	सदस्य
११.	प्रमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनिधी	निमंत्रक

बैठकीच्या सुरुवातीस सचिव हयांनी असे प्रतिपादन केले की मंडळातील सहमुख्य अधिकारी श्री. बळीराम पवार हयांची बदली झाली असून त्यांच्या जागी श्री. एम.बी गवादे हयांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच उपमुख्य अभियंता (द) श्री टि. एम. भुवनदास हयांची बदली झाली असून त्यांच्या जागी श्री. एस. एच.देसाई हयांची नियुक्ती करण्यात आली आहे.हया दोन्ही नविन अधिका-यांचे सचिव हयांनी सर्वातर्फे हार्दिक स्वागत केले.

तद्नंतर मा. सभापती हयांनी सहमुख्य अधिकारी श्री. बळीराम पवार व उपमुख्य अभियंता (द) श्री. टि. एम.. भुवनदास हयांनी मंडळामध्ये चांगले काम केल्याबद्दल त्यांचे सर्वातर्फे आभार मानून बैठकिस सुरूवात करण्याच्या सूचना सचिव हयांना दिल्या.

तद्नंतर सचिव हयांनी मा. सभापती, सन्मा.सदस्य , उपस्थित अधिकारी कर्मचारी वर्गाचे स्वागत करून बैठकिस सुरूवात केली. बैठकीच्या सुरूवातीस मुख्य लेखाधिकारी हयांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सन २००१-२००२ (व २००२-२००३) चा वार्षिक लेखा मंडळाच्या स्विकृतीसाठी पटलावर सादर करून असे प्रमाणित केले की,हा लेखा वित्त नियंत्रक / प्रा.हयांनी प्रमाणित केला असून सदर प्रस्ताव मंडळाच्या माहितीसाठी व स्विकृतीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर लेखा स्विकृत करण्याचे सर्वानुमते ठरले .

<u>ठराव क्रमांक : ९६ / ७६८</u>

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सन २००१-२००२ चा वार्षिक लेखा सर्वानुमते स्विकृत करण्यात आला. 2002-2003

<u>बाब क्रमांक : ९६.१</u>

विषयः-दि. १७.११.२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या ९५ व्या बैठकिचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

सदर कार्यवृत्तांत पृ.क्र. १ ते ५३ वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की दि. १७.११.२००३ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या बैठकीमध्ये इ.क्र. ३६ वी, ना.म.जोशी मार्ग, सरस्वती भुवन हया इमारतीबाबत अशी विचारणा केली गेली होती की, हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी आमदार निधितून निधी दिला आहे किंवा नाही. आमदार निधीतून हया इमारतीसाठी निधी दिला गेलेला नसून इ. क्र. ३१७, जी.के. मार्ग सरस्वती बिल्डिंग हया इमारतीसाठी आमदार निधीतून निधी दिलेला आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हा आमदार निधी वरळी मतदार संघातून दिला असावा कार्यकारी अभियंता (फग / द विभाग) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की. इ.क्र.३६ बी,सरस्वती बिल्डिंग गणपतराव कदम मार्ग हया इमारतीसाठी वरळी मतदार संघातून आमदार निधी देण्यात आला असून हया इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने अशी सूचना केले की, त्यांनी सदर दुरुस्ती व पुनर्रचना मंडळासाठी रू.१०/- लक्ष आमदार निधी दिला असून दुरुस्तीचे काम प्राधान्यानेपूर्ण करावे.

वरील सविस्तर चर्चेअंती सदर कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

---**---

<u>बाब क्रमांक : ९६.२</u>

विषय :- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिति
--कालावधी दि. ८.११.२००३ ते दि.. १७.१२.२००३.

सदर माहिती पृ.क्र.५५ वर मंडळाच्या माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद घेण्यात आली.

----**----

दक्षिण परिमंडळ

बाब क्रमांक : ९६.३(अ)

विषय :-दक्षिण परिमंडळातील सन २००३ मधील धोकादायक इमारतींची सदयस्थिती

सदर माहिती पृ.क्र.५७ ते ६३ वर मंडळाच्या माहितीसाठी सादर करण्यात आली आहे. सदर माहितीची नोंद घेण्यात आली.

---**---

बाब क्रमांक : ९६.३(ब)

विषय :- इ.क्र. १४३-१४५ ढब्बू स्ट्रीट हया इमारतीच्या दुरुस्तीच्या प्रशासकिय मान्यतेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.६५वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द)हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुस-या टप्प्याच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास मंडळाच्या दि.१६.१०.२००३ रोजीच्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यात आली होती. मात्र त्याबाबत कार्यवृत्तांतामध्ये नोंद न झाल्याने सदर प्रस्ताव मंडळाच्या मंजूरीसाठी फेरसादर करण्यात आला आहे. मंजूरी मिळाली असल्याने दुरुस्ती कामाच्या निविदा मागवून त्या उघडण्यात आल्या आहेत.

ठराव क्रमांक : ९६ /७६९

इ.क्र. १४३-१४५ ढब्बू स्ट्रीट हया इमारतीच्या दुस-या टप्प्याच्या दुरुस्तीच्या रू.४,४७,७९६/- (रू.७५३.८२ प्रति चौ.मी दराने) अंदाजपत्रकास मंडळाच्या दि. १६.१०.२००३ रोजीच्या बैठकितदेण्यात आलेली प्रशासकिय मंजूरी स्थायी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

----**----

बाब क्रमांक : ९६.३ (क)

विषय :-इ.क्र.९२-१०२ खेतवाडी बँक रोड हया इमारतीच्या दुरुस्तीबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.६७ ते ६९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभ्यिंता (द) हयांनी असे प्रतिपादन कले की, हया इमारतीच्या चौथ्या टप्प्याच्या दुरुस्तीच्या रू. १२,५१,८३४/- (रू.९५७.०५ प्रती चौ.मी दराने) रक्कमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास मंडळाच्या दि. २१.०७.२००१ रोजीच्या बैठकित प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यात आली होती. दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून वास्तुशास्त्रज्ञांनी सादर

केलेल्या अंदाजपत्रकानुसार प्रत्यक्ष झालेला खर्च रू.१३,००,०९९/- (रू .९९३.९५ प्रती चौ.मी) असून सदर खर्च सुधारीत प्रशासकिय मंजूरी रक्कमेपेक्षा रू.४८,२६५/- ने जास्त झाला आहे.

सविस्तर चर्चेअंती वाढीव खर्चास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९६ /७७०

इक्र.. ९२-१०२ खेतवाडी बँक रोड हया इमारतीच्या चौथ्या टप्प्याच्या दुरुस्तीसाठी सुधारीत प्रशासकिय मंजूरी रक्कम रू. १३,००,०९९/- पेक्षा अधिक झालेल्या रू. ४८२६५/- खर्चास सर्वनुमते मंजूरी देण्यात आली.

---***----

बाब क्रमांक : ९६.३(ड)

विषय :-दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्यादुरुसती कामांच्या मूळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. ७१ ते ११७ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द) हयांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील 'अे' विभगातील १,'बी' विभागातील ६, 'सी १-२' विभागातील ८, 'सी३-४' विभागातील ४, 'डी-१' विभागातील १ व 'डी-२' विभागातील १ अशा एकूण २१ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकिय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकुण २१ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ /सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

---**---

ठराव क्रमांक : ९६ /७७१

दक्षिण परिमंडळातील एकूण २१ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' नुसार प्रशासकिय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

---***---

बाब क्रमांक : ९६.४ (अ)

विषय :-इ.क्र. २३, ३६-३६ए,चापशी भिमजी मार्ग, ३८ ए, ४०-४४, ४८-५०, ५०ए,५० बी व सी म्हातारपाखाडी मार्ग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस सुधारीत प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. ११९ ते १३९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुन)हयांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकितइमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली असून मंडळाच्या दि.१६.१०.९३ रोजीच्या बैठकितहया योजनेच्या रू. १,३३,२९,४२०/- खर्चास प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यात आली होती. सध्याच्या धोरणानुसार किमान २२५.०० चौ. फूट क्षेत्रफळाचे गाळयांचे नियोजन करून सुधारीत नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात आलेआहे. मंजूर नकाशांनुसार जुन्या १०४ गाळयांऐवजी नविन इमारतीत १२१ गाळे बांधण्यात येणार आहेत. सुधारीत अंदाजपत्रकानुसार हया योजनेसाठी एकूण रू. ३,२६,२०,८३८/- खर्च अपेक्षित असूनत्यास मंडळाची सुधारीत प्रशासकिय मान्यता आवश्यक आहे. सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यानंतर भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर केला जाईल.

सविस्तर चर्चेअंती हया योजनेस सुधारीत प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

---***----

<u>ठराव क्रमांक : ९६ /७७२</u>

इ.क्र. २३,३६-३६ ए ,४०-४४, ४८-५०,५०ए,बी व सी म्हातारपाखाडी रोड हया इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणीयोजनेच्या रू. ३,२६,२०,८३८/- खर्चास सुधारीत प्रशसकिय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

---**---

<u>बाब क्रमांक : ९६.४(ब)</u>

विषय :-इ.क्र.५८,५८(ए),५८(बी), ५८ (सी),५८(डी),५८ (ई),५८(एफ), म्हातारपाखाडी रोड हया इमारतींच्या संयूक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.१४१ ते १५५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकितइमारतींची संयूक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली असून जुन्या ३७ गाळयांऐवजी मंजूर नकाशांनुसार नवीन बांधल्या जाणा-या इमारतीत ५३ गाळे बांधण्यातयेणार आहेत. हया योजनेसाठी रू. १,३९,९५,७१९/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची प्रशासकिय मंजूरी आवश्यक आहे. मंडळाच्या मंजूरीनंतर भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविता जाईल.

सविस्तर चर्चेअंती हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरेल.

---**---

<u>ठराव क्रमांक : ९६ /७७३</u>

इ.क्र.५८,५८(ए),५८(बी),५८(सी),५८(डी),५८(ई),५८(एफ), म्हातारपाखाडी रोड हया इमारतींच्या संयूक्त पुनर्बांधणी योजनेच्या रू.१,३९,९५,७१९/- खर्चास प्रशासकिय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

---**----

बाब क्रमांक : ९६.४(ब)

विषय :-इ.क्र.६७४-६७४ ए, ना.म. जोशी मार्ग 'ई' विभाग हया पुनर्बांधणी योजनेस सुधारीत प्रशासकिय मंजूरी प्रदान करणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. १५७ ते १६१ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुर्न) हयांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकित पुनर्बांधणी योजनेचा रू. २६.९० लक्ष खर्चास मंडळाच्या दि. १८.४.७९ रोजीच्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यात आली होती हया इमारतीखालील भूखंड ताब्यात असून सदयःच्या धोरणानुसार किमान २२५.०० चौ.फूट चटई क्षेत्रफळाचे गाळयांचे नियोजन करून सुधारीत नकाशांना म.न्.पा.ने दि. ०६.०५.९९ रोजी मंजूरी दिलेली आहे. मंजूर नकाशांना जुन्या २०(नि)+ २ (अनि)= २२ गाळयांऐवजी नविन इमारतीत ३३(नि)+ २(अनि)= ३५ गाळे बांधले जाणार आहेत. अंदाजपत्रक तयार करून पुनर्बांधणी कामाच्या निविदसही प्राप्त झालेल्या आहेत. अंदाजपत्रकानुसार हया योजनेसाठी रू. ९६.०१ लक्ष खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची सुधारीत प्रशासकिय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती हया ययोजनेस सुधारीत प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

---**----

ठराव क्रमांक : ९६ /७७४

इ.क्र. ६७४-६७५ ए, ना, म. जोशी मार्ग हया पुनर्बांधणी योजनेच्या रू. ९६.०१ लक्ष खर्चास सुधारीत प्रशासकिय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

---***----

बाब क्रमांक : ९६.४(ड)

विषय :इ.क्र. ६७४-६७४ ए.ना.म. जोशी मार्ग हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या कामाची निम्नतम दराची निविदा मंजूर करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. १६३ ते १६७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुर्न) हयांनी असे प्रतिपादन केले की. हया पुर्नबांधणी कामाच्या एकूण ८ निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी मे.संजय कन्स्ट्रक्शन हयांची उणे १९ टक्के दराची निविदा निम्नतम आहे. सदर ठेकेदाराने पूर्वी केलेल्या कामांचा अहवालानुसार त्यांच्या कामाचा दर्जा चांगला आहे. त्यामुळे सदर ठेकेदाराची निविदा मंजूर करण्याबाबत मंडळाने निर्णय घ्यावा,

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीचे रहिवाशी त्यांना भेटले होते. ही निम्नतम निविदा फारच उणे दराची असल्याने हयाबाबत रहिवाशांशी चर्चा करून निर्णय घ्यावा लागेल.

तद्नुषंगाने का.अ./ पु.वि.२ हयांनी असे प्रतिपादन केले की ही इमारत सन १९८३ मध्ये ८८(३)(अ) प्रमाणपत्रानुसार घोषित केलेली आहे. जुन्या २२ गाळयांऐवजी नविन इमारतीत ३५ गाळे उपलब्ध होणार आहेत. निविदा मागविल्यानंतर एकूण ८निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी मे. संजय कंन्स्ट्रक्शन हयांची उणे १९ टक्के दराची निविदा निम्नतम आहे. हया इमारतीच्या पुनर्रचनेच्या कामास विलंब झाल्याने प्रकरण न्यायालयात दाखल केले होते. हया इमारतीचा पुनर्रचनेच्या कामास जानेवारी २००४ अखेर सुरूवात केली जाईल असे आपण मा. न्यायालयात कबूल केलेले आहे.

मा. सदस्य श्री. संजय शिर्के हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की रहिवाशांबरोबर हयाबाबत चर्चा करण्यात आली असून त्यांनी उणे १९ टक्के कामे दराच्या निविदाधारकाकडून काम करण्यास संमती दर्शविली आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की कामाचा दर्जा चांगला राहण्याच्या दृष्टिने रहिवाशांना त्यांची समिती स्थापन करून कामाच्या दर्जाची देखरेख करण्यासाठी त्यांना त्यांचा वास्तुशास्त्रज्ञ नेमण्यास सांगावे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, ज्या निविदा उणे १० टक्केपेक्षा कमी दराने भरल्या जातात अशा निविदांबाबत म.न.पा. मध्ये उणे १० टक्क्यापेक्षा जेवढी उणे टक्केवारी भरलेली असते तेवढया रक्कमेची सुरक्षा अनामत रक्कम संबंधित ठेकेदाराकडून भरून घेतली जाते. हा मुद्दा मंडळाच्या मागील बैठकित उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी असे ठरले होते की, म.न.पा.प्रमाणे आपण ठराव संमत करून ज्या निविदा उणे १० टक्केपेक्षा कमी दराने भरलेल्या असतील तर अशीउणे १० टक्केपेक्षा जेवढी उणे टक्केवारी भरली असेल तेवढी रक्कम संबंधित ठेकेदाराकडून सुरक्षा अनामत रक्कम म्हणून जमा करून घेऊन नंतरच संबंधित ठेकेदारास काम देण्यात यावे. तान ही अट निविदेमध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. हयाबाबतचा सविस्तर प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकित सादर ~~केला जाईल~~. करण्याबाबत उमुअ (पुनर्र) यांना सुचना देण्यात आली.

सविस्तर चर्चेअंती मे. संजय कन्स्ट्रक्शन हयांची उणे १९ टक्के दराची निविदा मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

---**---

<u>ठराव क्रमांकः ९६ /७७५</u>

इ.क्र. ६७४- ६७४ ए, ना.म.जोशी मार्ग हया पुनर्बांधणी कामाची मे. संजय कन्स्ट्रक्शन हयांची उणे १९ टक्के दराची निम्नतम निविदा सर्वानुमते मंजूर करण्यात आली. तसेच कार्यादेशात त्याची होणाऱ्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---**---

<u>बाब क्रमांक : ९६.४(ई)</u>

विषय :इ.क्र. ७५-७७ व ७९ म्हातारपाखाडी रोड भूखंड क्र. ४९३ व ४९४ माझंगाव विभाग येथील पुनर्रचित इमारतीस 'अष्टगंध सहकारी गृहनिर्माण संस्था' हे नाव देण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.१६९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतींचे सचिव श्री. चंद्रकांत कवटेकर हयांनी त्यांच्या दि. ११.११.२००३ रोजीच्या पत्रान्वये हया इमारतीस 'अष्टगंध सहकारी गृहनिर्माण संस्था' हे नाव मंजूर करण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मंडळापुढे मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

---***---

<u>ठराव क्रमांक : ९६ /७७६</u>

इ.क्र. ७५-७७ व ७९ म्हातारपाखाडी रोड भूखंड क्र. ४९३ व ४९४ माझंगाव विभाग येथील पुनर्रचित इमारतीस 'अष्टगंध सहकारी गृहनिर्माण संस्था' हे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---**---

<u>सहकार संस्था कक्ष</u>

<u>बाब क्रमांक : ९६.५</u>

विषयः - म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम १०३ (ब) अन्वये भूसंपादन करण्याच्या प्रस्तावास विशेष भूसंपादन अधिकारी हयांनी आपले स्तरावर नामंजूर केलेल्या निर्णयावर फेर विचार करण्यासाठी शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

अ) इ.क्र.१२०, शिवाजी पार्क, डॉ.एम.बी. राऊत मार्ग, दादर, मुंबई-२८ येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजित देवछाया स.गृ.नि.संस्था.

ब)अश्विन हाऊस, २७ के.अे.सुब्रमणियम रोड माटुंगा, मुंबई-१९ येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजित विनायक स.गृ.नि.संस्था

क) वैदय साठे बिल्डिंग, २२-२४, काकडवाडी, गिरगाव, मुंबई-०४ येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजित वैदय साठे स.गृ.नि संस्था.

सदर प्रस्ताव पृ.क्र. १७१ ते १८१ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगानेउपमुख्य अभिंयंता (द) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया तीन प्रस्तावांमध्ये मंडळाच्या मंजूरीनंतर रहिवाशांनी ३० टक्के रक्कम मंडळाकडे जमा केलेली आहे. तद्नंतर हया प्रस्तावामध्ये भूसंपादनास शासनाने मंजूरी दिल्यानंतर विशेष भूसंपादन अधिकारी हयांनी त्यांच्या स्तरावर हे प्रस्ताव नामंजूर केले आहेत.हे प्रस्ताव नामंजूर करताना विशेष भूसंपादन अधिकारी हयांनी अशी कारणे दिली आहेत की १) हया प्रस्तावामध्ये ७० टक्के रहिवाशांची संमती नाही व २) हया इमारतींना दुरुस्तीची आवश्यकता नाही. त्यामुळे हेप्रस्ताव शासनाकडे फेरमंजूरीसाठी सादर करणे आवश्यक असून त्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव शासनाकडे फेरमंजूरीसाठी सादर करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

---***----

<u>ठराव क्रमांक : ९६ /७७७</u>

म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (ब) अन्वये विशेष भूसंपादन अधिकारी हयांनी नामंजूर खालील ३ प्रस्ताव शासनाकडे भूसंपादनाच्या फेरमंजूरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

अ) इ.क्र.१२०, शिवाजी पार्क, डॉ.एम.बी. राऊत मार्ग, दादर, मुंबई-२८ येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजित देवछाया स.गृ.नि.संस्था.
ब)अश्विन हाऊस, २७ के.अे.सुब्रमणियम रोड माटुंगा, मुंबई-१९ येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजित विनायक स.गृ.नि.संस्था
क) वैदय साठे बिल्डिंग, २२-२४, काकडवाडी, गिरगाव, मुंबई-०४ येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजित वैदय साठे स.गृ.नि संस्था.

---**---

<u>उत्तर परिमंडळ</u>

<u>बाब क्रमांक : ९६.६</u>

विषयः- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरूस्ती कामांच्या मूळ/ सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. १८३ ते २४१ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभिंयंता (उ) हयांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील 'ई' विभागातील ७,'फग (द)' विभागातील ८ व 'फग (उ) विभागातील ६ अशा एकूण २१ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ /सुधारीत नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकिय मंजूरीसाठी

सादर करण्यात आली आहेत. पृ. क्र.२०५ व २०९ वर इ.क्र. ८१-८३,८५-८७ ठाणावाला बिल्डिंग सेनापती बापट मार्ग असा उल्लेख केला आहे.त्याऐवजी इ.क्र ८१-८३,८५-८७ ठाणावाला बिल्डिंग, सिताराम जाधव मार्ग असे वाचण्यात आले.तसेच पृ.क्र.२१५ वर इमारतीचे क्षेत्रफळ ३४८.९० चौ.मी. नमूद केले आहे.त्याऐवजी ते २९४.४० वाचावा व दुरुस्तीचा दर रू. ९४५.५३ प्रति चौ.मी. ऐवजी ११२०.५७ चौ.मी. वाचावा.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील एकूण २१ इमारतींच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

---***----

<u>ठराव क्रमांक : ९६ /७७८</u>

उत्तर परिमंडळातील एकूण २१इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'ब' नुसार प्रशासकिय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

---***---

<u>बाब क्रमांक : ९६.७</u>

विषय :- मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी ठेवावयाचे विषय

१) मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावायाच्या विषयामध्ये 'मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे ९ प्रस्ताव मंडळाच्या मंजूरीसाठी पटलावर सादर करण्यात आले.(१ ते ९)

विषय :-१) भुकर पहाणी क्र. २८७, ताडदेव विभाग, विभाग क्र. डी-३६९८ (९)व ३६९८ (१०)इ.क्र.२व ११ तुकाराम जावजी रोड, मुंबई येथील ग्लास बंगला नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता 'ना हरकत प्रमाणपत्र ' प्रदान करण्याबाबत.

२) भुकर पाहणी क्र. ९४, ताडदेव विभाग, विभाग क्र. डी-४७५९-६०, इ.क्र.१४९, अलीभाई प्रेमजी मार्ग, मुंबई येथील हेम सदन नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत प्रमाणपत्र ' प्रदान करण्याबाबत.

३) भुकर पहाणी क्र. २२४/१० माटुंगा विभाग भूखंड क्र. २८६ दादर माटुंगा इस्टेट विभाग क्र. एफ ७३७८ (१)इ.क्र.३, माटुंगा रोड, मुंबई येथील विनोद व्हीला म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत प्रमाणपत्र ' प्रदान करण्याबाबत.

४)भुकर पहाणी क्र. १६९ (भाग),भूखंड क्र.१, परेल शिवडी विभाग विभाग क्र.एफ.एस.१२२७(१),१२२७(२),१२२८(३), १२२८(४), १२२८(५), इ.क्र.१५५ए, १५५बी, १५६डी, शिवडी रोड, मुंबई येथील ' कृष्णा प्रेस चाळ कंपाऊंड' म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत प्रमाणपत्र ' प्रदान करण्याबाबत.

५) भुकर पाहणी क्र. ३०७२,१/३०७२,३०७४,३०७५ व ३०७६ भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-६५६५ (१-२),६५६६ व ६५६७(१-२), ६५६२(२) इ.क्र.५-९,११ व १३, पहिली सुतार गल्ली, मुंबई ह्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत प्रमाणपत्र ' प्रदान करण्याबाबत.

६)अंतिम भूखंड क्र. ८३८, नगररचना योजना क्र.४, माहिम विभाग, विभाग क्र.जीएन-४५१९ (३),इ.क्र.०६, काशीनाथ धुरू स्ट्रीट, दादर, मुंबई येथील ' सुजाता निवास 'नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत प्रमाणपत्र ' प्रदान करण्याबाबत.

७)अंतिम भूखंड क्र. ७९७, नगररचना योजना क्र.४, माहिम विभाग, विभाग क्र.जीएन-४४३३(६),इ.क्र.६८-६८ सी गोखले रोड (उत्तर) दादर, मुंबई येथील 'कासा मारिया' नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत प्रमाणपत्र ' प्रदान करण्याबाबत.

८)भुकर पहाणी क्र. ५४५/१० माटुंगा विभाग भूखंड क्र.. ७५१, दादर माटुंगा विभाग, विभाग क्र. इ.क्र.३,जिमखाना रोड, माटुंगा ,मुंबई येथील माणिक व्हिला म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत प्रमाणपत्र ' प्रदान करण्याबाबत.

९)भुकर पहाणी क्र. २३८/१० माटुंगा विभाग क्र.एफ एन.७४९६ (५) इ.क्र.१४,भिमाणी स्ट्रीट, माटुंगा, मुंबई येथील 'श्री वाहे गुरू प्रसाद' म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत प्रमाणपत्र ' प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की,हया सर्व प्रस्तावांमध्ये ७० टक्के रहिवाशांची संमती असून अर्जदारांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. इमारतीतीलरहिवाशांची यादी, त्यांच्या जागेचे क्षेत्रफळ,जुन्या इमारतीचा नकाशा व रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे विभागीय कार्यालयाने प्रत्यक्ष जागेवर तपासून प्रमाणित केली आहेत.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रस्तावांमध्ये किमान ७० टक्के रहिवाशांचीसंमती आहे हयांची खातरजमा करून नंतरच नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावे. ब-याच वेळा नाहरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर रहिवाशांच्या संखेवरून तक्रार केली जाते. वर्तमानपत्रातही हयाबाबत बातम्या छापून येत असतात.त्यामुळे प्रस्ताव परिपूर्ण असल्यावरच मंडळापुढे सादर करावेत.

सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील सादर केलेल्या वरील ०९ प्रस्तावांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधिन राहून नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९६ /७७९

मुंबई बेटावरील खाली ०९ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.(१ ते ९)

१) भुकर पहाणी क्र. २८७, ताडदेव विभाग, विभाग क्र. डी-३६९८ (९)व ३६९८ (१०)इ.क्र.२व ११ तुकाराम जावजी रोड, मुंबई येथील ग्लास बंगला नावाने ओळखली जाणारी मालमत्ता .

२)भुकर पाहणी क्र. ९४, ताडदेव विभाग, विभाग क्र. डी-४७५९-६०, इ.क्र.१४९, अलीभाई प्रेमजी मार्ग, मुंबई येथील हेम सदन नावाने ओळखली जाणारी मालमत्ता

३)भुकर पहाणी क्र. २२४/१० माटुंगा विभाग भूखंड क्र. २८६ दादर माटुंगा इस्टेट विभाग क्र. एफ ७३७८ (१)इ.क्र.३, माटुंगा रोड, मुंबई येथील विनोद व्हीला म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

४)भुकर पहाणी क्र. १६९ (भाग),भूखंड क्र.१, परेल शिवडी विभाग विभाग क्र.एफ.एस.१२२७(१),१२२७(२),१२२८(३), १२२८(४), १२२८(५), इ.क्र.१५५ए, १५५बी, १५६डी, शिवडी रोड, मुंबई येथील ' कृष्णा प्रेस चाळ कंपाऊंड' म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता .

५) भुकर पाहणी क्र. ३०७२,१/३०७२,३०७४,३०७५ व ३०७६ भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-६५६५ (१-२),६५६६ व ६५६७(१-२), ६५६२(२) इ.क्र.५-९,११ व १३, पहिली सुतार गल्ली, मुंबई ओळखली जाणारी मालमत्ता.

६)अंतिम भूखंड क्र. ८३८, नगररचना योजना क्र.४, माहिम विभाग, विभाग क्र.जीएन-४५१९ (३),इ.क्र.०६, काशीनाथ धुरू स्ट्रीट, दादर, मुंबई येथील ' सुजाता निवास 'नावाने ओळखली जाणारी मालमत्ता .

७)अंतिम भूखंड क्र. ७९७, नगररचना योजना क्र.४, माहिम विभाग, विभाग क्र.जीएन-४४३३(६),इ.क्र.६८-६८ सी गोखले रोड (उत्तर) दादर, मुंबई येथील 'कासा मारिया' नावाने ओळखली जाणारी मालमत्ता.

८)भुकर पहाणी क्र. ५४५/१० माटुंगा विभाग भूखंड क्र.. ७५१, दादर माटुंगा विभाग, विभाग क्र. इ.क्र.३,जिमखाना रोड, माटुंगा ,मुंबई येथील माणिक व्हिला म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता .

९)भुकर पहाणी क्र. २३८/१० माटुंगा विभाग क्र.एफ एन.७४९६ (५) इ.क्र.१४,भिमाणी स्ट्रीट, माटुंगा, मुंबई येथील 'श्री वाहे गुरू प्रसाद' म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

२)विषय :- इ.क्र. ८०-८२-८४ कामाठीपुरा ८ वी गल्ली भूखंड क्र. १५५,१५६ व १५७ भायखळा विभाग हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली असून म.न.पा.ने मंजूर केलेल्या नकाशानुसार जुन्या इमारतीतील एकूण ३५ गाळयांऐवजी नविन इमारतीत एकूण ३४ गाळे बांधलेजाणार आहेत. हया योजनेसाठी रू. ८१,११,७२०/- खर्च अपेक्षित असून त्यांस मंडळाची प्रशासकिय मंजूरी आवश्यक आहे.मंडळाच्या मंजूरीनंतर भूसंपादनाचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे सादर केला जाईल.

सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस प्रशासकिय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

---***---

<u>ठराक क्रमांक : ९६ /७८०</u>

इ.क्र.८०-८२-८४ कामाठीपुरा ८ वी गल्ली भूखंड क्र. १५५,१५६,व १५७ भायखळा विभाग येथील संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रू. ८१,११,७२०/- खर्चास प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यात आली.

---**---

३) विषय:- इ.क्र. १०३,१०५,१०७,१०९ कामाठीपुरा २री गल्ली भूखंड क्र. ५१,५२,५३,५४ भायखळा विभाग येथील संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतलेली आहे. म.न.पा. ने मंजूर केलेल्या नकाशानुसार जुन्या इमारतीतील एकूण ३० गाळयाऐवजी नविन इमारतीत ३९ गाळे बांधलेजाणार आहेत. हया योजनेसाठी रू. ९२,६४,२५१/- खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची प्रशासकिय मंजूरी आवश्यक आहे. तसेच इ.क्र.१०९ कामाठीपुरा ३री गल्ली हया इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(ब) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास मंडळाची मंजूरी

आवश्यक आहे. मंडळाच्या मंजूरीनंतर भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला जाईल.

सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस प्रशासकिय मंजूरी देण्याचे तसेच इ.क्र. १०९ कामाठीपुरा २री गल्ली हया इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(ब) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

----**----

<u>ठराव क्रमांक : ९६ /७८१</u>

इ.क्र. १०३,१०५,१०७,१०९ कामाठीपुरा २री गल्ली भूखंड क्र. ५१,५२,५३,५४ भायखळा विभाग हया इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रू. ९२,६४,२५१/- खर्चास प्रशासकिय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली तसेच इ.क्र. १०९ कामाठीपुरा २री गल्ली हया इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(ब) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

----***----

४) विषय:- इ.क्र. १४७-१४९ झुबेदा मंझील वीर सावरकर मार्ग, माहिम या इमारतीकरिता ८८ (३)(अ) प्रमाणे मंजूर झालेला प्रस्ताव रद्द करणेबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी असे प्रतिपादन केले की, ही इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(अ) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास मंडळाच्या दि. १२.०९.२००३ रोजीच्या बैठकित मंजूरी देण्यात आलेली आहे. परंतु आता हया इमारतीतील रहिवाशांनी एकत्र येवून हया इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी नाहरकत प्रमाणपत्र (परताव्यासह) प्रस्ताव सादर केलेला आहे. हया इमारतीचा भूखंड अरूंद असल्याने तिची पुनर्रचना करणेही शक्य नाही. त्यामुळे ८८(३)(अ) प्रमाणे मंजूर केलेल्या प्रस्ताव रद्द करण्यासाठी मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

ठराव क्र: ९६/७८२ इमारत क्र. १४७-१४९ झुबेदा मंझील वीर सावरकर मार्ग, माहिम या

सविस्तर चर्चेअंती ~~ह्या~~ इमारतीस ८८(३)(अ) प्रमाणपत्र जारी करण्यास मंडळाने दिलेली मंजूरी रद्द करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---***---

५) विषयः- इ.क्र. ३५ उंद्रिया स्ट्रीट नागपाडा (उपकर क्र. ई २९६)नागपाडा मुंबई हया इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(अ) नुसार प्रमाणपत्र जारी करणेबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाशांनी दुरुस्तीच्या खर्चाची प्रचलित प्रमाणित मर्यादेवरील जादा रक्कम रु. ३.९८ लक्ष मंडळाकडे भरलेली नाही. त्यामुळे ही इमारत म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(अ) प्रमाणपत्रान्वये दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेपलिकडे घोषित करण्यासाठी मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर इमारतीस ८८(३)(अ) प्रमाणपत्र जारी करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

----***----

<u>ठराव क्रमांक : ९६ /७८३</u>

इ.क्र. ३५ उंद्रिया स्ट्रीट नागपाडा (उपकर क्र. ई २९६)नागपाडा मुंबई हया इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(अ) नुसारप्रमाणपत्र जारी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

----***----

६) विषय :- इ.क्र. ३४६ सर जे.जे. रोड ची दुरुस्तीसाठी पुनर्रचनेचा निधी वापरण्याबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

इ.क्र. ३४२-३४२ डी व ३४६ हया इमारती सलंग्न आहेत. हया इमारतींखालील अर्धा भूखंड मंडळाच्या ताब्यात असून उर्वरित भूखंड अदयाप मंडळाच्या ताब्यात आलेला नाही. जो अर्धा भूखंड मूळ मालकाच्या ताब्यात आहे त्या भागाची दुरुस्ती मंडळाने केलेली आहे. हया भूखंडावर एक सामाईक कमान असून हया कमानीचा अर्धा भाग मंडळाच्या ताब्यातील भूखंडावर व अर्धा भाग मूळ मालकाच्या ताब्यातील भूखंडावर आहे. कमान अर्धी दुरुस्त ~~न करता~~ येत असल्याने मंडळाने संपूर्ण कमानीची दुरुस्ती केलेली आहे. हया दुरुस्तीसाठी झालेल्या रू. १.९२ लक्ष पैकी अर्धा खर्च पुनर्रचनेच्या निधीतून केला होता. त्यावेळी लेखा शाखेने हयास मंडळाची मंजूरी घेण्याबाबत कळविले होते.

मुख्य लेखाधिकारी त्यांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती खर्चाच्या निधीमधून खर्च करावयाचा झाल्यास दुरुस्ती उपकरात वाढ करणे आवश्यक असते. त्यामुळे ही बाब मंडळापुढे सादर करण्यासाठी सांगितले होते.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती अनिवार्य झाल्याने त्यासाठी खर्च करण्यात आला आहे. रू. १०००/- प्रति चौ.मी. प्रमाणित मर्यादेत निधी उपलब्ध नसल्याने झालेला खर्च दुरुस्तीच्या उपलब्ध निधीतून व रू.१०००/- प्रति चौ. मी. वरील खर्च पुनर्रचनेच्या निधीमधून दयावा लागणार आहे. रू. १०००/- प्रति चौ.मी. मर्यादेत वाढ झाल्यानंतर सदर खर्च वाढीव प्रमाणित मर्यादेत अंर्तभूत करून ॲडजस्ट केला जाईल असे प्रस्तावित आहे. इमारत क्र. ३४२-३४२ डी हया इमारतीच्या पुनर्रचनेचे काम जवळजवळ पूर्ण होत आलेले आहे. हया परिस्थितीत दुरुस्तीसाठी केलेला खर्च पुनर्रचना निधीतून वर्ग करण्याचे प्रस्तावित केले आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,ते जेव्हा उपमुख्य अभियंता (पुनर्र) हया पदावर कार्यरत होते त्यावेळचा हा विषय आहे. कमानीचे जे स्ट्रक्चर आहे त्याचा अर्धा भाग पुनर्रचनेअंतर्गत व अर्धा भाग दुरुस्तीअंतर्गत येतो. जर आपण असे ठरवले की दुरुस्तीसाठी खर्च करावयाचा नाही तर त्या परिस्थितीत हया कमानीच्या भागाचे जोपर्यंत आपण भूसंपादन करीत नाही तोपर्यंत मंडळाच्या पुनर्रचना योजनेचे काम हाती घेता येणे शक्य नव्हते. हया अशा विचित्र परिस्थितीमध्ये दुरुस्तीवर खर्च करणे क्रमप्राप्त झाले होते.मंडळाने पुनर्रचित केलेली इमारत व त्याशेजारील भूसंपादित न केलेल्या जागेवरील इमारत हयांना येण्याजाण्याचा मार्ग म्हणून हया कमानीचा वापर केलका जातो. रहिवाशांच्या सुरक्षिततेचा दृष्टिने हया कमानीच्या भागाची दुरुस्ती करणे अनिवार्य होते. त्यामुळे हया कमानीची दुरुस्ती करून त्याचा खर्च पुनर्रचना निधीतून भागविण्याची मंजूरी देण्यात आलेली आहे.

मुख्य अधिकारी तसेच मुख्य लेखाधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती कामाचा खर्च पुनर्रचना निधीतून केल्यास त्यास ऑडीट आक्षेप घेऊ शकते. त्यामुहे मुख्य लेखाधिकारी हयांनी असे सुचविले की, मंडळाच्या बैठकीमध्ये ठराव संमत करून प्रस्ताव प्राधिकरणापुढे मंजूरीसाठी सादर करावा. हयाप्रमाणे सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचा सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक :९६ /७८४</u>

इ.क्र. ३४६ सर जे.जे.मार्ग हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी केलेला खर्च पुनर्रचना निधीतून मागविण्यात मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणापुढे मंजूरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

मा. सदस्य श्री. बाप्प सावंत हयांनी तद्‌नंतर असे प्रतिपादन केले की, मुख्य अधिकारी हयांच्या नियंत्रणाखाली मंडळाच्या अधिकारी वर्गाने अचानकपणे पाहणी केले ही अतिशय चांगली कामगिरी केली आहे. हयामुळे संक्रमण शिबिरातील घुसखोर व्यक्तींवर जरब बसण्यास मदत झाली असून हया पाहणीत काही घुसखोर व्यक्ती गाळयांत कुलुपे लावून पळून गेल्या होत्या. त्याही घुसखोर व्यक्तींचा शोध मंडळाने घ्यावा. हया पाहणीमुळे अंदाजे५००० गाळे रिकामे प्राप्त होणार आहेत. तसेच मंडळाच्या पुनर्रचित इमारतींची पाहणी केल्यानंतर असे दिसून आले आहे की मंडळाने कामाचा दर्जा चांगला राखून अतिशय चांगल्या इमारती बांधल्या आहेत. हयास्तव मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी मा. सभापती व सन्मा. सदस्यांतर्फे मंडळाच्या अधिका-यांचे अभिनंदन केले हया पुनर्रचित इमारतींच्या गाळयांचे तसेच कुंभारवाडा येथील दुर्गावाडीमध्ये पुनर्रचित केलेल्या इमारतीचाही ताबा संबंधित रहिवाशांना लवकरात लवकर देण्यात यावा अशी विनंती मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी केली.

मा. सभापती हयांनी तद्‌नंतर असे प्रतिपादन केले की, इमारतीच्या पुनर्रचनेचे काम पूर्ण झाल्यानंतर आपण गाळयांचा ताबा देण्याची प्रक्रिया सुरू करतो. तसे न करता पुनर्रचनेचे काम चालू असतानाच गाळयांचा ताबा व ताबा देण्यापूर्वी कराव्या लागणा-या बाबींची प्रक्रिया सुरू करण्याची कार्यवाही सुरू करणे आवश्यक आहे.जेणेकरून इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर लगेचच रहिवाशांना ताबा देणे शक्य होईल. पारशीवाडी, पटेल बिल्डिंग, छत्रीवाला चाळ, कांचवाला चाळ हया इमारतींच्या पुनर्रचनेचे काम जलदगतीने करण्यात आले आहे.त्याचप्रमाणे गाळे वाटपही जलदगतीने करण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्‌नुषंगाने असे प्रतिपादन केले की,मागील एक वर्षात आपण ज्या कामांच्या निविदा मंजूर केल्या ती सर्व कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. काही इमारतींमध्ये नविन बांधकाम साहित्य वापरण्यात आले असून पारशीवाडी हया इमारतीतील रहिवाशांनी त्यांच्या इमारतीच्या पुनर्रचनेचे काम अत्यंत उत्कृष्ट झाल्याचे सांगितले आहे. मंडळाने मंजूर केलेल्या सुधारीत बांधकाम साहित्यानुसार व वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार पुनर्रचनेची कामे केली जात असून गाळयांचा ताबा लवकरात लवकर देण्याच्या दृष्टिने 'बी' व 'सी' फार्म तयार करून ते पाठविण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. हयामध्ये एकच अशी अडचण आहे की हयाप्रकरणी बीइएसटी कार्यालयाकडून मदत / सहकार्य मिळत नाही. जे.जे. हॉस्पिटल येथे पुनर्रचित केलेली इमारत रंगरंगोटी करून वाटपासाठी तयार आहे. मात्र बीईएसटी कडून हया ठिकाणी दोन सबस्टेशनसाठी जागेची मागणी केलेली आहे. परंतु हया ठिकाणी उपलब्ध असलेल्या ५ फूट मोकळया जागेखालून जलवाहिन्या जात असल्यामुळे ज्या ठिकाणी जागा देता येत नाही. या परिस्थितीत इमारतीतील दोन गाळे देण्याचा प्रस्ताव त्यांच्याकडे पाठविला. परंतू मुख्य अधिकारी हयांच्याशी चर्चा करून मा. उपाध्यक्ष/प्रा त्यांच्या स्तरावर पत्र पाठवून हा प्रश्न सोडविण्याची

विनंती केली आहे. आतापर्यंत जवळजवळ १३ ते १४ इमारती बांधून तयार झालेल्या आहेत.हया सर्व इमारती आपण रहिवाशांना मालकी तत्वावर देणार आहोत. त्यामुळे हया रहिवाशांना त्यांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करून इमारत ताब्यात घेण्यास सांगितले आहे. मागील एक वर्षाचा अनुभव लक्षात घेता असे दिसून येते की, शांती भूवन, गंगावाणी चाळ, खोजा चाळ, बोरीची चाळ हयांचा ताबा देण्यात आलेला आहे. परंतू हया रहिवाशांची सहकारी गृहनिर्माण संस्था करणे व कन्व्हेन्स करणे हया प्रक्रीयेस विलंब होत आहे. दुर्दैवाने उपमुख्य अधिकारी, श्री. साळवे हयांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्याकडे सर्व कागदपत्रांचीपूर्तता करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या जागी जबाबदार अधिका-यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. रहिवाशांची सह.गृह. संस्था स्थापन करून अशा सह. गृह. संस्थेच्या ताब्यात जर आपण इमारती दिल्या नाहीत तर पंतप्रधान अनुदान प्रकल्प कार्यालयामार्फत बांधलेल्या इमारतींसारखी परिस्थिती उद्भवणार नाही.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने अशी विचारणा केली की हया इमारतींना जो कर लावला जाणार आहे तो किती व कसा असणार आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,शासनाच्या नगरविकास विभागाच्या निर्णयानुसार विकास नियंत्रण नियमावली क्र, ३३(१०) नुसार अल्प उत्पन्न गटातील गाळयांसाठी व मंडळाच्या गाळयासाठी करात सवलती दिल्या आहेत. मात्र हयामध्ये दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे पुनर्रचित इमारतीत बांधण्यात आलेले गाळे असा स्पष्ट उल्लेख केलेला नसल्याने अद्दयाप पुनर्रचित इमारतीतील गाळयांना करात सवलती दिल्या जात नाहीत.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, शासनाच्या वरील निर्णयाची प्रत त्यांना देण्यात यावी. नागपूर अधिवेशनातही करात सवलती देण्याबाबत विचार केला गेला होता.रहिवाशांना त्यांची एक संघटना तयार करण्यास सांगण्यात आले असून मालमत्ता कर कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे. सदयां आकारण्यात येणा-या मालमत्ता कराची रक्कम पाहता भविष्यकाळात रहिवाशी हयांच्या इमारतींच्या पुनर्रचनेस विरोध करतील.व संक्रमण शिबीरातच राहणे पसंत करतील.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, बी.ई एस.टी.चे चेअरमन श्री. आशिष चेंबूरकर हे त्यांच्या मतदार संघातील असून तसेच बीईएसटीचे जनरल मॅनेजर श्री. क्षत्रिय हे त्यांच्या चांगल्या परिचयाचे आहेत. तसेच श्री. बबन कनोजे हे मंडळाने बीइएसटी समितीवर प्रतिनियुक्तीवर पाठविलेले सदस्य आहेत. हया सर्वांची मदत घेऊन पुनर्रचित इमारतींचा भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,सरस्वती बिल्डिंग च्या पुनर्रचनेचे काम पूर्ण होऊन सहा महिने झाले आहेत.परंतु अद्दयाप सबस्टेशनचे प्लॅन

बीइएसटी ने मंजूर न केल्याने सबस्टेशनचे बांधकाम कसा आलेले नाही.हयामुळे इमारतीतस भोगवटा प्रमाणपत्र मिळू शकत नाही. वास्तविक सबस्टेशनसाठी जागा दिल्यानंतर बीइएसटी कार्यालयाने त्याचे आराखडे तयार करून बांधकाम करणे आवश्यक आहे. मात्र ही कामे बीईएसटी मंडळाकडून करून घेते. ही कामे करण्यास साधारणतः ७ते ९ महिन्याचा कालावधी जातो.हयाबाबत जुन्या इमारतीत पूर्वी जेवढा विदयुत पुरवठा केला जात होता तेवढा तरी विदयुत पुरवठा नविन इमारतीत करण्याबाबत बीईएसटी ला लेखी कळविण्यात आले आहे जेणेकरून गाळयांचे वाटप करता येईल.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,हयाबाबत बीईएसटीकडे असाही युक्तीवाद करण्यात यावा की, जुन्या इमारतींना सबस्टेशन नविन इमारतींना सब स्टेशनचा आग्रह का धरला जातो. तसेच इमारत व त्यातील रहिवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने सबस्टेशन इमारतीत बांधणे कितपत संयुक्तीक आहे. इमारतीत सबस्टेशनसाठी जागा देण्यामुळे मंडळाचे गाळेही कमी होतात. बीईएसटी ची मंडळाकडे सबस्टेशन मागण्याचीकृती ही एक प्रकारे मंडळाला गुमावण्याचा प्रकार आहे. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये अधिका-यांची त्यांची मदत घेऊन पाठपुरावा करावा.

मा. सभापती हयांनी तद्नंतर अशी सूचना केली की, ज्या काही ४-५ इमारतींच्या पुनर्रचना योजनेची कामे पुर्ण झाली आहेत.त्यांच्या गाळेवाटपाची कार्यवाही मार्च व एप्रिल २००४ पूर्वी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री हयांच्या हस्ते सुरू करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांची तक्रार तद्नंतरअसे प्रतिपादन केले की, पुनर्रचित इमारतींची पाहणी करताना मानाजी राजूजी चाळ हया इमारतीबाबत लॉबीचा वाढीव खर्चाचा प्रस्ताव हया बैठकिमध्ये सादर करण्याचे ठरले होते. ही इमारत पाहिल्यानंतर प्रवेशद्वाराच्या लॉबीचे जे काम करण्यात आले आहे ते अतिशय चांगले झाले आहे. ज्याप्रमाणे खाजगी इमारतीत काम केले जाते त्याचप्रमाणे हया इमारतीचे काम झाले आहे. परंतु हयासाठी वाढीव खर्च झाला असल्याने त्यास मंडळाची मान्यता लागणार आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,हया इमारतीमध्ये दोन ठिकाणी प्रवेशद्वाराजवळ लॉबी ठेवण्यात आली आहे. खाजगी इमारतीत आकर्षक लॉबी तयार केल्या जातात ज्यामुळे इमारत पाहताक्षणी चांगली वाटते. सन्मा. सदस्यांनी सुचना केल्यानुसार हया इमारतीतील लॉबीचे बांधकाम करताना जी लादी बसविली आहे. ती हिरव्या मार्बलची आहे व बाजूला लाल ग्रॅनाईट लादी बसविली आहे तसेच त्यासमोरिल जिन्याचा छन्न मार्गाचा भाग ही मार्बल व ग्रॅनाईट वापरून तयार केला आहे. हयामुळे हया इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या लॉबीचा भाग अतिशय आकर्षक झाला आहे.मात्र हयामुळे खर्चात थोडया प्रमाणात वाढ झालेली आहे. एक दुकानाचा गाळा कमी केल्याने लॉबीचे आकारमान वाढले आहे.इतर इमारतीबाबतही जरी लॉबीचे

आकारमान कमी असले तरी आपण लॉबीचे काम आकर्षक करण्यास सुरूवात केलेली आहे. कांचवाला चाळ हयापुनर्रचित इमारतीची लॉबी सिरॅमीक टाईल्स व कडाप्पा बार्डरमध्ये व जिन्याचा तळमल्याचा भागामध्येही त्याप्रकारचे बांधकाम केल्याने अतिशय आकर्षक झालेली आहे. प्रत्येक इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या लॉबीचा भाग आकर्षक करण्याचा प्रस्ताव आहे.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत व इतर सन्मा. सदस्यांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, वाढीव खर्चाच्या प्रस्तावास मंडळाने सर्वानुमते तत्वतः मंजूरी दिली आहे असे गृहित धरून सविस्तर प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकित मंजूरीसाठी सादर करावा.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, ज्या ज्या ठिकाणी आपण मोठी पुनर्बांधणी योजना हाती घेतो अशा मोठया पुनर्रचना योजनांमध्ये व्यायामशाळा, वेल्फेअर सेंटरहयांचीही तरतूद करणे आवश्यक आहे. पटेल इमारतीची पुनर्रचना योजना मोठी असून तेथे बगीच्याच्या जागेमध्ये आवश्यक सुविधांची तरतूद करणे आश्यक आहे.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की,बदामवाडी सह. गृह. संस्था हया इमारतीची नुकतीच पाहणी केली.. हया इमारतीतील रहिवाशांनी पत्र पाठवून असे ७० टक्के रहिवाशांनी हया इमारतींच्या पुनर्रचनेची विनंती केली आहे. त्यामुळे हया प्रकरणी लक्ष घलून त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,हया इमारतीतील रहिवाशांबरोबर झालेल्या चर्चेनुसार रहिवाशांनी हया इमारतीच्या पुनर्रचनेची मागणी केली आहे. ही इमारत सीआरझेडमुळे बाधीत असून इमारत अतिशय दुरावस्थेत आहे. यामुळे मा. सभापती हयांनी हया इमारतीची पुनर्रचना योजना मंडळाने हाती घेण्याच्या सूचना उपमुख्य अभियंता (पुनर्र)हयांना केल्या. तसेच मा. सभापती हयांनी प्रतिपादन केले की,पुनर्रचना विभागासाठी अतिरिक्त कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्याबाबतही कार्यवाही होणे आवश्यक आहे. जेणेकरून पुनर्रचनेची कामे सुरळीत व वेगाने होतील बोरी चाळीच्या पुनर्रचनेबाबत ही विचार होणे आवश्यक आहे. हया चाळीच्या भूखंडासह बाजूच्या भूखंड एकत्र करून पुनर्रचना योजना राबविण्याचाही विचार होणे आवश्यक आहे. हया चाळीची पाहणी मुख्य अधिकारी हयांच्या समवेतनुकतीच करण्यात आली आहे. इमारत अतिशय दुरावस्थेत आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,हया इमारतीच्या तीन बाजूला दुकानांचे गाळे आहेत. समोरच्या बाजूलाच फक्त रस्ता आहे. हया इमारतीखालील भूखंडाचा बराचसा भाग आरक्षणाने बाधीत असल्यानेम.न.पा.ने नियोजित इमारतीच्या नकाशांना मंजूरी दिलेली नाही हयाबाबत तात्कालीन मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण)हयांचाशी चर्चा करण्यात आली होती. शासनाच्या नगर विकास विभागाने दि. २५/०१/९९ रोजी जे नोटिफिकेशन काढले आहे.त्यामध्येज्या सवलती दिल्या आहेत. त्या फक्त विकास नियमन नियमावली क्र.३३(७)मधील

पुर्नविकास योजनांना लागू केलेल्या आहेत. हयानुसार खाजगी विकासक आरक्षणाने बाधीत जागेचा विकास ३३ टक्के जागा आरक्षणासाठी ठेवून करू शकतो. मात्र हया सवलती मंडळाच्या विकास नियमन नियमावली क्र. ३३(९)मधील पुनर्रचना योजनांना लागू बसल्याने मंडळ हया इमारतीची पुनर्रचना करू शकत नाही. त्यामुळे हया सवलती मंडळाच्या विकास नियमन नियमावली क्र. ३३(९)मधील पुनर्रचना योजनांना लागू तात्कालीन मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) हयांना विनंती करण्यात आली होती. आरक्षणामुळे मंडळ ७-८ इमारतींची पुनर्रचना योजना घेऊ शकत नाही.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,हया इमारतीशेजारील भूखंड एकत्र करून आपण पुनर्रचना योजना हाती घेऊ शकतो का हयाची तपासणी करणे आवश्यक आहे. हया दृष्टिने चर्चा करण्याच्या सूचना मा. सभापती हयांनी उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांना दिल्या.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, संक्रमण शिबीरांमध्ये ज्या नविन इमारती बांधून गाळे वाटप झाले आहे.हयाची माहिती यादीसह मंडळापुढे सादर करण्याबाबत दि. ८/१२/२००३ रोजी एक पत्र पाठविले आहे. हयाबाबतची माहिती मंडळापुढे सादर न केल्याने सादर करण्याबाबतची विनंती मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी केली.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,जुन्या बैठया चाळीच्या संक्रमण शिबीरांच्या जागेवर नविन स्वरूपाच्या इमारती बांधण्यात आल्या आहेत. हयामध्ये किती अतिरिक्त संक्रमण गाळे मंडळाला मिळणार आहेत अशी विचारणा मा. सभापती हयांनी केली. सायन सारख्या भागात आपणांस जास्तीतजास्त संक्रमण शिबीर गाळयांची आवश्यकता आहे. ज्या जुन्या गिरण्यांच्या जागा प्राप्त होणार आहेत त्यावर गाळे बांधून ते न विकता संक्रमण शिबीर गाळे म्हणूनच त्यांचा वापर करावा अशी आग्रही विनंती मा. मुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य व नागपूर येथील अधिवेशनात केलेली आहे. आपल्या संक्रमण शिबीरांच्या जागेवर बहुमजली इमारती बांधताना आपले जे काही संक्रमण गाळे होते त्यापेक्षा जास्त गाळे बहुमजली इमारतीत देणे आवश्यक आहे असे असताना आपणांस कमी गाळे प्राप्त झाले आहेत हे पूर्णतः चुकीचे आहे.हयाबाबत प्राधिकरणकिंवा पूर्वीच्या मंडळाने जे काही ठराव केले आहेत त्याची माहिती व किती जुने संक्रमण गाळे पाडून बहुमजला इमारतीत किती गाळे प्राप्त झाले हयाची सविस्तर माहिती वस्तुस्थितीसह मंडळाच्या पुढील बैठकित सादर करण्यात यावी अशी सूचना मा. सभापती यांनी केली.

मा. सभापती हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, वडाळा येथे बांधावयाच्या संक्रमण शिबीराच्या योजनेची सद्द:स्थिती काय आहे. तद्नुषंगाने उपमुख्य अभियंता (सं.शि.) हयांनी

असे प्रतपादन केले की, हया कामाच्या निविदा मंडळाच्या मागील बैठकित नामंजूर करण्यात आल्या होत्या. मा. उपाध्यक्ष / प्रा. हयांच्या आदेशानुसार हया निविदा प्राधिकरणाच्या आगामी बैठकीपुढे सादर करण्यात येणार आहेत.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,मंडळाने हया निविदा नामंजूर केल्या असल्याने त्या प्राधिकरणापुढे मंजूरीसाठी सादर करणे योग्य होणार नाही. प्राधिकरणापुढे हया निविदा सादर करताना त्यामध्ये हयाप्रमाणे स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

मा. सदस्य, श्री. रमेश परब हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की,गिरगाव येथे विजयश्री ही इमारत पुनर्रचित करण्यात आली आहे. हया इमारतीतील रहिवाशांना आपण सहकारी गृह.संस्था स्थापन करण्यास सांगितले आहे. मात्र सह.गृह.संस्था स्थापन करण्यास काही अडचणी येत असल्याने अदयाप सह.गृह.संस्था स्थापन झालेली नाही असे कळले हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा मा. सदस्य श्री. रमेश परब हयांनी केली.

हयाबाबत मा. सदस्य, श्री. सचिन सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की,हया इमारतीतील रहिवाशांच्या शिष्टमंडळाशी केलेल्या चर्चेनुसार त्यांनी नियोजित सहकारी गृह.संस्था स्थापन केली असून हया इमारतीच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. हया इमारतीच्या देखभालीचा खर्च इमारतीतील रहिवाशांनी करावा असे मंडळाने त्यांना कळविले आहे. काही रहिवाशांनी परस्पर गाळे विकले असून भाडेकरू बदलात मंडळाची परवानगी घेण्याची प्रक्रिया चालू आहे. मंडळ अशा बदलास परवानगी देते का ? अशी विचारणा मा.सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी केली.

उपमुख्य अधिकारी (पु.गा.) हयांनी असे तद्नुषंगाने प्रतिपादन केलेकी, भाडेकरू बदलास मंडळाकडून आता परवानगी दिली जात नाही. रहिवाशांनी हे गाळे परस्पर विकलेले आहेत.

मा. सदस्य, श्री. सचिन सावंत हयांनी तद्नुषंगाने अशी विचारणा केली की, जोपर्यंत सहकारी गृह.संस्था नोंदणीकृत होत नाही तोपर्यंत भाडेकरू बदलास मंडळाकडून परवानगी दिली जाते किंवा नाही.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,इमारतीच्या पुनर्रचनेच्या काळात ज्या रहिवाशांनी गाळे विकले आहेत त्यांच्या जागी नविन आलेल्या रहिवाशांनी गाळेवाटपाचे पत्र त्यांच्या नावे देण्याची विनंती मंडळास केलेली आहे. मंडळाने तद्नुषंगाने त्यांच्याकडे कागदपत्रांची मागणी केली असून भाडेकरू हक्क बदलची रक्कमही त्यांच्याकडे मागितली आहे.त्यामुळे हया इमारतीतील रहिवाशांचे असे म्हणणे आहे की, जोपर्यंत भाडेकरू हक्क बदलास मंजूरी मिळत नाही तोपर्यंत सह.गृह.संस्था नोंदणीकृत होऊ शकत नाही अशा परिस्थितीत भाडेकरू बदल हक्काचे आर्थिक नुकसान होईल व त्यामुळे ते इमारतीची देखभाल कशी करणार. मा. सभापतीहयांनी हया इमारतीतील काही रहिवाशांना प्रत्यक्ष सभागृहात बोलावून चर्चा केली. सविस्तर चर्चेनंतर मा.

सभापती हयांनी असे रहिवाशांना असे सांगितले की, भाडेकरू हक्क बदलास मंडळ परवानगी देणार नाही. भाडेकरू हक्क बदलास रहिवाशांच्या सह. गृह. संस्थेनेच मंजूरी दयावी. रहिवाशांनी सांगितल्यानुसार सह. गृह. संस्था नोंदणीकृत करण्याची कार्यवाही चालू आहे. परंतु सद्यः उपनिबंधक नसल्याने पुढील कार्यवाही होत नाही. सह. गृह. संस्था नोंदणीकृत होण्यास विलंब लागत नाही.

कार्यकारी अभियंता (पु.वि.२)हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचना विभागामध्ये आतापर्यंत एकाही पुनर्रचित इमारतीची सह.गृह.संस्था नोंदणीकृत झालेली नाही. जिल्हा उपनिबंधक (सह.. गृह. संस्था) हयांनी मागणी केलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. हयामध्ये अडचण अशी आहे की, किमान ११ मूळ/ भाडेकरू नसतील तर सह.गृह.संस्था नोंदणीकृत होत नाही.

सभागृहात उपस्थित असलेल्या रहिवाशांनी असे सांगितलेकी जिल्हा उपनिबंधक(स.गृ.सं.) हयांनी हया इमारतीतील रहिवाशांची प्रमाणित यादी मंडळाकडून मागविली असून त्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

मा. सभापती हयांनी वरील परिस्थितीत अशी प्रतिक्रिया व्यक्त केली की, पुनर्रचनेचा कार्यक्रम गतिमान करण्याबाबत वरील सर्व बाबी विरोधात आहेत. त्यामुळे रहिवाशी मंडळाकडून इमारतीची पुनर्रचना करून घेण्यास कसे तयार होतील. हयापेक्षा खाजगी विकासकांमार्फत इमारतींचा विकास करणे संयुक्तीक होईल असे वाटते. ही अशीच परिस्थिती राहिल्यास भाडेकरू इमारती मालकी तत्वावर घेण्यास तयार होणार नाहीत व पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींप्रमाणेच याही इमारतींची स्थिती होईल.

तद्नंतर उपस्थित रहिवाशांनी असे सांगितले की, जे गाळे भाडेकरू व रहिवाशी अशा दोन नावाने आहेत त्यातील रहिवाशी ५०-६०वर्षापासून इमारतीत रहातात वत्यांच्या वास्तव्याचा पुरावाही सादर केलेला हि इमारत कोर्ट रिसीव्हरच्या ताब्यात असल्याने भाडेपावत्या दिल्या जात नाहीत. ज्या भाडेपावत्या उपलब्ध आहेत त्यामध्ये भाडेकरूंची नावे आहेत. रहिवाशांकडे भाडेपावती वगळता इतर सर्व कागदपत्रे आहेत असे असताना गाळे वाटप भाडेकरू व रहिवाशी अशा दोघांच्या नावे करणे कितपत योग्य आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,भविष्यकाळात जर भाडेकरूने त्याच्या हक्काची मागणी केल्यास त्यात कायदेशीर अडचणी निर्माण होतात. कायदेशीर अडचणी उद्भवू नयेत म्हणून गाळे वाटप भाडेकरू व रहिवाशी अशा दोघांच्या नावाने केले जाते.

उपस्थित रहिवाशांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, भूसंपादनाच्या प्रक्रियेच्या वेळी भूसंपादन अधिकारी रहिवाशांची यादी प्रसिध्द करन हयाबाबतचे आक्षेप /हरकती मागवितात कोणाचेही आक्षेप/ हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर अशाप्रकरणात रहिवाशांच्या नावे गाळे वाटप

करण्यास हरकत नसावी. मात्र अशा प्रकरणात मूळ भाडेकरूंचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले जाते. मूळ भाडेकरूंचा ठाव ठिकाणा उपलब्ध नसल्यास नाहरकत प्रमाणपत्र सादर करता येत नाही.

उपमुख्य अधिकारी (पु.गा.) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की ज्या प्रकरणात मूळ भाडेकरूंचे नाहरकत प्रमाणपत्र सादर केलेले नसते अशा प्रकरणात आपण भाडेकरू व रहिवाशी अशा दोघांचीही नावे गाळे वाटप करताना टाकली जातात. मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, कायदेशीर अडचणी उद्भवू नयेत म्हणूनच गाळे वाटप करताना भाडेकरू व रहिवाशी अशा दोघांचीही नावे टाकली जातात. हयाबाबत मा. उपमुख्य मंत्री (गृहनिर्माण) हयांच्याबरोबर चर्चाही झाली होती. परंतु कायदेशीररित्या गाळे वाटप हे लाभार्थी म्हणजेचभाडेकरू व रहिवाशी हयां दोघांच्या नावानेच करणे अनिवार्य आहे.

उपस्थित रहिवाशांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की भाडेकरू व रहिवाशी अशा दोघांच्या नावे गाळे वाटप करण्यास त्यांचा आक्षेप नाही. मात्र जेव्हा सह. गृह संस्थेच्या नोंदणीसाठी रहिवाशांची नावे पाठविली जातील तेव्हा त्यात भाडेकरू व रहिवाशी अशा दोघांच्याही नावाचा उल्लेख असल्यास सह. गृह. संस्थेच्या नोंदणीमध्ये अडचणी उद्भवतील.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, भाडेकरू हक्क बदलासाठी भाडेकरूंची काहीतरी कागदपत्रे पुराव्यादाखल सादर करणे आवश्यक आहे. परंतु हयाबाबतचा काहीच पुरावा नसल्याने आपण गाळे वाटप भाडेकरू व रहिवाशी अशा दोघांच्या नावाने करतो. सह. गृह. संस्था नोंदणीकृत झाल्यानंतर सदर संस्थेने त्यांच्या स्तरावर भाडेकरू हक्क बदलास परवानगी दयावी.

मा. सभापती हयांनी बैठकिच्या शेवटी सन्मा. सदस्य, अधिकारी / कर्मचारी वर्गाचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले तसेच मंडळाची पुढाली बैठक ~~16-1-04~~ 21.1.04 दि. दुपारी 3.00 ———— वाजता घेण्यात येईल असे जाहीर केले.

कार्यकारी अभियंता

निवासी कार्यकारी अभियंता / दु. व पु.

उप अभियंता

सभापती
मुं. इ. दु. व पु. मंडळ
जावक क्र.
दिनांक

107-corr 13/1/04

मुख्य अधिकारी/ दु.. व पु.

मा. सभापती / दु. व पु.मंडळ.

मंडळाच्या दिनांक २२/१२/२००३ रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या आलेल्या दक्षिण परिमंडळातील अंदाजपत्रकांची यादी.

अ.क्र	इमारतीचा तपशिल	विभाग	दुरुस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र	मजल्यांची संख्या भाडेकरुंची संख्या	इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ दुरुस्तीचा दर	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम	निव्वळ टप्प्याची रक्कम	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम	शेरा
१.	इ.क्र. ७, बोरा स्ट्रीट	अ	दुसरा मंडळ	तळ + २ ४ + ०= ४	११६.८८ १२१४.१०	१४१९०३.००	८८३५२.००	२१४१००.००	मंजूर
२.	इ.क्र. १७-१९ उमरखाडी रोड	ब	दुसरा मंडळ	तळ + २ १५ + १= १६	५०९.७८ ७९९.७१	४०७५३६.००	३४६३६१.००	0.00	मंजूर
३.	इ.क्र. १९१-अ, अब्दुल रहेमान स्ट्रीट	ब	दुसरा मंडळ	तळ + ५ ९ + १= १०	४४४.०० ११७९.५९	५२८१७९.००	३०६१७९.००	१७९५९०.००	मंजूर
४.	इ.क्र. ३ नवरोजी हील रोड नं.५	ब	पहिला मंडळ	तळ + ५ २२ + ९= ३१	१८६८.४६ ९७७.८१	१८२७००९.००	१८२७००९.००	0.00	मंजूर
५.	इ.क्र. १५९-१६७-अे, शायदा मार्ग	ब	चौथा/सुधारीत मंडळ	तळ + ४ ४४ + ११= ५५	२३७४.२५ ८८३.२०	२०९६९५२.००	१८२६९५२.००	0.00	मंजूर
६.	इ.क्र. ७३-७५, डॉ. महेश्वरी रोड	ब	दुसरा/ सुधारीत मंडळ	तळ + ३ ३७ + ६= ४४	१३७६.०० ९७१.३६	१३३६६०१.००	१०२५७५४.००	0.00	मंजूर
७.	इ.क्र. ४९-अे, सॅन्डास रोड	ब	दुसरा/ सुधारीत मंडळ	तळ + ३ ३९ + १३= ५२	१६७५.०२ १०४१.४०	१७४४३८२.००	१३६३४७४.००	४१४००.००	मंजूर
८.	इ.क्र. ९०-११४ इब्राहिम रहिमतुलला रोड	सी-१/२	दुसरा मंडळ	तळ + ३ २९ + ११= ४०	९५५.३२ ९३२.७०	८९४७६०.००	६६४००१.००	0.00	मंजूर
९.	इ.क्र. २२-२४ पहिली कारपेन्टर स्ट्रीट	सी-१/२	तिसरा मंडळ	तळ + ३+४ पार्ट ३३ + ५= ३८	१२१४.१० ७०२.००	८५२२९३.००	४२४९००.००	0.00	मंजूर

१०.	इ.क्र. २-४, धरमसी कॉस लेन/ १९-२५ गुज्जर स्ट्रीट	सी-१/२	दुसरा मंडळ	तळ + २+३पार्ट १३ + ८= २१	६१४.८६ ७५७.४४	४६५७२०.००	१५२५२०.००	०.००	मंजूर
११.	इ.क्र. १८३-१९५, डॉ. माहिमतुरा मार्ग [एस.व्ही.पी. रोड]	सी-१/२	पांचवा मंडळ	तळ + ४ ६० + १६= ७६	३२३६.०० ९६७.१६	३१२९७१८.००	७६३४०५.००	०.००	मंजूर
१२.	इ.क्र. ५४-६०, व्ही. पी. रोड	सी-१/२	चौथा मंडळ	तळ + २+३पार्ट २३ + ९= ३२	८६१.०५ १२९०.२०	१११०९६२.००	२७७५७६.००	२९०२००.००	मंजूर
१३.	इ.क्र. १३८-१४०, अब्दुल रहेमान स्ट्रीट	सी-१/२	दुसरा मंडळ	तळ + ५ १० + २= १२	६१६.३२ ८६७.५०	५३४६६०.००	३७२०६२.००	०.००	मंजूर
१४.	इ.क्र. ८८ इब्राहिम रहिमतुलला रोड	सी-१/२	तिसरा मंडळ	तळ + ४ १३ + ३= १६	५३७.७८ ९५१.६२	५११७६३.००	२९८०२५.००	०.००	मंजूर
१५.	इ.क्र. ८७-१०१, इरास्कीन रोड,	सी-१/२	दुसरा मंडळ	तळ + १ १० + २१= ३१	७७०.९० ९९०.१९	७६३३४०.००	२८५३८८.००	०.००	मंजूर
१६.	इ.क्र. २७-३३ सिताराम पोदार मार्ग	सी-३/४	चौथा मंडळ	तळ + २ १६ + ४= २०	९६५.५३ १०९०.२७	१०५२६९३.००	२३८५४६.००	९०२७०.००	मंजूर
१७.	इ.क्र. ६-अे, झावबा वाडी	सी-३/४	चौथा ना.ह.प्र.	तळ + १ १६ + ०= १६	२३८.३२ १३४५.१९	३२०५८६.००	१४४१४९.००	३४५१९०.००	मंजूर
१८.	इ.क्र. ४१-४३ चंपा गलली	सी-३/४	पहिला मंडळ	तळ + ४ १ + ४= ५	४०७.८२ ९६५.३५	३९३६९२.००	३९३६९२.००	०.००	मंजूर
१९.	इ.क्र. ३८-आय, कापरेश्वर स्ट्रीट	सी-३/४	दुसरा/सुधारीत मंडळ	तळ + १ ९ + ८= १७	३०२.८१ ९९४.७७	३०१२२८.००	२२८४७९.००	०.००	मंजूर
२०.	इ.क्र. ३८६-डी, व्ही. पी. रोड	डी-१	चौथा मंडळ	तळ + २ २९ + ०= २९	१७५९.६८ ९३९.४८	१६५३१९६.००	९५३४३४.००	०.००	मंजूर
२१.	इ.क्र. १०२-११२, डॉ. डी . बी. मार्ग	डी-२	तिसरा मंडळ	तळ + २ ४२ + १= ४३	१४९४.४६ १२०५.५०	१८०१५८०.००	३८५३५९.००	१२१२०.००	मंजूर

५२

परिशिष्ट "ब"

मंडळाच्या दि.२३/१२/२००३ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजुरी देण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांची यादी

अ. क्र	विभाग	वर्गवारी	इमारतीचे नांव	दुरुस्ती टप्पा / मंडळ/ ना.ह.प्र.	मजले / भाडेकरु नि+अनि=एकूण	क्षेत्रफळ चौ.मी. / दर चौ.मी.चा खर्च	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम	रु.१०००/-प्रति चौ.मी.मंजुरी करीता प्रस्तावित रक्कम	रु.१०००/-प्रति चौ.मी.जास्त असलेली रक्कम	शेरा
१.	ई	अ	१३८, म्हातारपाखाडी रोड, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ ३ ३ + १= ४	४५६.७० १००३.६३	४५८३५६/- ४५८३५६/-	४५६७००/-	१६५६/-	मंजूर
२.	-"-	क	१९६-अे, रे रोड, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ८ + २= १०	४८४.५० ९९३.५९	४८१३९६/- २४२९८३/-	२४२९८३/-	--	-"-
३.	-"-	क	१७, डी.पी.वाडी, चासकर निवास, माझगांव, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ ६ + २= ८	११८.७० ९७६.५४	११४०३९/- ११४०३९/-	११४०३९/-	--	-"-
४.	-"-	क	३-३डी, चमार लेन, भायखळा, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ ६ + ४= १०	६३२.३२ ९८५.४०	६२३०१२/- ५४२१०५/-	५४२१०५/-	--	-"-
५.	-"-	अ	१९-२१, बदलू रंगारी स्ट्रीट, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ + ३ ४८ + १४= ६२	१५१५.२२ १०४५.९६	१५८४८६८/- ४२६७८४/-	३५७१३६/-	६१,६४८/-	-"-
६.	-"-	-"-	३-५, लोबो मॅन्शन, क्राअस्ट चर्च स्ट्रीट, मुंबई	प.टप्पा सुधा. मंडळ	तळ + ३ १२ + ०= १२	२७१४.०४ ५०१.२८	१३६०४९५/- १३६०४९५/-	१३६०४९५/-	--	-"-
७.	-"-	-"-	६/ २४, सेठ मोतीशा लेन, मुंबई	दु.टप्पा सुधा. मंडळ	तळ + ३ ३६ + १०=४६	१२८७.४२ ९९९.८९	१२८७२८४/- ९५११७४/-	९५११७४/-	--	-"-
८.	फ.ग/द	अ	८१-८३, ८५-८७, ठाणावाला बिल्डींग, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ० ३ + ५ = ८	१५९.०१ १३८५.६८	२२०४४८/- २२०४४८/-	२२०४४८/-	--	-"-
९.	-"-	ब	१२६-सी-डी, सिंग इस्टेट, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पुर्व), मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ४ २० + ० = २०	१७९९.०० ६८०.२०	१२२३६८९/- ७२१८२१/-	७२१८२१/-	--	-"-
१०.	-"-	अ	३५४-बी, सिता सदन, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ,मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + २ १९ + ५ = २४	१०४९.९६ ९७३.६५	१०२२२९९/- ३५४८८६/-	३५४८८६/-	--	-"-

२६

५५

११.	फ.ग/द	अ	१८२-सी, देवी धरमदास वाणी चाळ, ना.म.जोशी मार्ग, लोअर परळ, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ० २२ + ० = २२	३४८.९० ९४५.५३	३२९८९७/- २६३८१५/-	२६३८१५/-	--	मंजूर
१२.	-"-	-"-	६४-६६-६८, अब्दुल कादर चाळ, सन मिल लेन, लोअर परळ, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + १ ४८ + ५ = ५३	८५७.५६ १०५४.११	१०३९७१/- २९७२५३/-	२५०८४२/-	४६४११/-	-"-
१३.	-"-	-"-	९४-सी, अव्वल बाग इस्टेट, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पुर्व), मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ २ ३० + ० = ३०	८६४.७७ ९९०.४५	८५६५१६/- ३०१९९८/-	३०१९९८/-	--	-"-
१४.	-"-	-"-	९४-डी, अव्वल बाग इस्टेट, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पुर्व), मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ २ २७ + ० = २७	८०५.६२ ९९७.२७	८०३४२५/- ३०३९८२/-	३०३९८२/-	--	-"-
१५.	-"-	-"-	१९४-बी, विल्सन बिल्डींग, डॉ.बी.ए.रोड, दादर (पुर्व), मुंबई	दु.टप्पा सुधा मंडळ	तळ+ ३ १३ + ४ = १७	२००४.३६ ९८९.७४	१९८३८१५/- ११६६६७८/-	११६६६७८/-	--	-"-
१६.	फ.ग/उ	अ	२७, मारिया व्हीला, भागोजी किर मार्ग, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ७ + ० = ७	५४०.३५ ६९२.१४	३७३९९९/- ३७३९९९/-	३७३९९९/-	--	-"-
१७.	-"-	-"-	२५, माऊंट व्हयु, कोर्ट रोड, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ १ ३ + ० = ३	५६९.०० ७४८.३४	४२५८०६/- ४२५८०६/-	४२५८०६/-	--	-"-
१८.	-"-	-"-	१६, मोहम्मद सराई चाळ, बालमिया लेन, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ १ २५ + ० = २५	७५९.०० ९८२.९४	७४६०५४/- ५९५२२४/-	५९५२२४/-	--	-"-
१९.	-"-	क	प्लॉट नं.३, लक्ष्मी निवास, रोड क्र.२४, सायन, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ २९ + १ = ३०	१७५३.०५ ५८६.८६	१०२८८०३/- ७४६२७५/-	७४६२७५/-	--	-"-
२०.	-"-	अ	२०१, सरस्वती सदन, दिलिप गुप्ते मार्ग, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ १६ + ० = १६	५५३.०० ९७९.३१	५४१५५९/- ५१४८८८/-	५१४८८८/-	--	-"-
२१.	-"-	-"-	२२-ई, महावीर बिल्डींग, भांडारकर रोड, माटुंगा, मुंबई	पाचवा टप्पा मंडळ	तळ + ३ ५५ + ९ = ६४	२६६६.०० ७०७.५१	१८८६२४०/- ७५९३०४/-	७५९३०४/-	--	-"-